hastkala Life

WOVEN BY CULTURE

30 YEARS

हस्तकला लाईफच्या पुढील
पुरवणीच्या मजकुरासाठी
संपर्क : रोहिणी कुलकर्णी 9819755919
ऐश्वर्या म्हैसकर - 91580 61923
साक्षी साबळे 93240 14616

VOLUME: 02 | ISSUE : 05 | February 2026 | 8 PAGES

Managing Editor : Nikhil Ballal

Supported by ठाणेवैभव



Pravin CHHEDA

CHAIRMAN, HASTKALA

Saree Walkathon: Power, Pride, Purpose

Every year, as we celebrate the spirit of womanhood during Women's Day month, the much-awaited Hastkala Saree Walkathon returns with renewed energy and enthusiasm. What began as a unique initiative to promote health, fitness, and self-care among women has today grown into a grand celebration of strength, resilience, and togetherness.

Last year, we were overwhelmed by the participation of more than 3,200 women who came together to walk with pride and purpose. Encouraged by the incredible response, we began preparations early this year, and the excitement has surpassed all expectations. With over 7,000 registrations already, women from Thane and beyond are gearing up to be part of this vibrant and meaningful event.

The Hastkala Saree Walkathon is not just about walking; it is about creating awareness that health is wealth. In the midst of balancing professional commitments and personal responsibilities, women often forget to prioritise themselves. This event serves as a gentle reminder to strike the right balance between work and leisure, to channelise energy positively, and to invest time in physical and emotional well-being.

At 6 a.m., the sight is truly mesmerising, thousands of women draped in their favourite sarees, walking alongside friends and family, radiating confidence and joy. The walkathon is a beautiful amalgamation of energy, enthusiasm, and vibrancy.

Last year, we witnessed inspiring moments, a mother in a wheelchair completing the walk with her daughter by her side, cancer survivors spreading awareness about regular health check-ups, and women from all walks of life participating with meaningful causes.

As we prepare to welcome everyone once again, we eagerly look forward to celebrating women's power and the unstoppable spirit of womanhood in all its glory.



कॅमेऱ्यामागच्या कथाकार

पत्रकार आणि छायाचित्रकार म्हणून कारकीर्द सुरू केलेल्या ज्योत्स्ना पेठे यांचा प्रवास आज दिग्दर्शक म्हणून नवी ओळख निर्माण करणारा ठरला आहे. घटनांच्या मागची सत्यकथा शोधणारी पत्रकार आणि त्या क्षणांना 'फ्रेम'मध्ये अचूक पकडणारी छायाचित्रकार म्हणून काम करताना त्यांच्या मनात दिग्दर्शनाची बीजं नकळत रोवली गेली. कॅमेऱ्याच्या लेन्समधून जग पाहताना प्रत्येक चेहऱ्यामागे दडलेली एक गोष्ट त्यांना दिसू लागली. स्थिर चित्रातल्या भावनांना हालचालीत आणि कथेत मांडण्याची ओढ निर्माण झाली आणि तिथूनच त्यांच्या दिग्दर्शन प्रवासाची सुरुवात झाली.

I पान ६ वर



ज्योत्स्ना पेठे

Pegboard: Bringing Order to the Brand World



Founder & CEO, Esha Nagar
& Tejasvi Nikam, Co-Founder & CSO

In a world where brands are expected to move at the speed of culture, many founders are building in real time - improvising, adapting, and learning as they go. Pegboard was born from that exact tension: the need for both intuition and structure. Founded by Esha Nagar (Founder & CEO) and Tejasvi Nikam (Co-Founder & CSO), the firm is a brand and culture consultancy built on the belief that creativity works best when it has a system to hang on to. Over the past two years, the agency has grown into a strategic partner for founders and organisations looking to build brands that are not just visually appealing, but deeply coherent.

I Pg. 6

The agency's focus remains on Connection Over Trends. Over the last two years, Pegboard has observed a consistent lesson across sectors: culture and connection sustain brands longer than aesthetics do. While campaigns may trend and visuals may refresh, it is the community and core values that endure. By embedding cultural insights into strategy, Pegboard builds narratives that offer long-term relevance rather than brief spikes in visibility, allowing a brand to evolve with the times without losing its soul.

गृहिणी ते ग्लॅमर क्वीन : एका स्वप्नपूर्तीची कहाणी





ठाण्यातील शिवाईनगर येथे राहणाऱ्या निशा फुलसुंदर या नावामागे एक संघर्षमय, प्रेरणादायी आणि आत्मविश्वासाने उजळलेला प्रवास आहे. सौंदर्योपचाराच्या व्यवसायातून कुटुंबाला आर्थिक आधार देत त्यांनी थेट Mrs. India Beautiful Face, Icon Top 5 Classic आणि Beautiful Eyes सारखे किताब पटकावत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. ग्रामीण भागातून आलेल्या, अल्पशिक्षित आणि मध्यमवर्गीय पार्श्वभूमी असलेल्या निशा आज अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत.

जुन्नर तालुक्यातील लेण्याद्री या गावात १ एप्रिल १९८६ रोजी त्यांचा जन्म झाला. एका शेतकरी कुटुंबात बालपण गेले. वडील हे जगाचे पोशिंदे असले तरी घरात अठराविश्वे दारिद्र्य होते. ताप आला तरच दूध-बिस्किट मिळणारी परिस्थिती, कसाबसा दोन वेळचा घास आणि नववीपर्यंतचे शिक्षण एवढ्याच मर्यादित त्यांचे बालपण घडले. लहानपणी ना हौस, ना मौज; पण मनात मात्र मोठी स्वप्ने होती. २००४ साली त्यांचे लग्न झाले आणि जुन्नरच्या छोट्याशा खेड्यातून त्या ठाणे शहरात आल्या. संसारवेलीवर दोन फुले उमलली. काही वर्षांतच कुटुंबाची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली. शिक्षण कमी असल्यामुळे नोकरी मिळत नव्हती. पण हार मानणं त्यांच्या स्वभावात नव्हतं. २०१४ साली त्यांनी ब्युटी पार्लरचा कोर्स पूर्ण केला आणि २०१५ मध्ये नोकरीला सुरुवात केली. चार-पाच वर्षांच्या अनुभवातून त्यांनी स्वतःच्या कलेवर विश्वास ठेवत 'होम सर्व्हिस' सुरू केली. फेशियल, हेअरकट, आयब्रोज, थ्रेडिंग, व्हॅक्सिंग अशा सेवा देताना त्यांनी केवळ बाह्यसौंदर्य नव्हे तर महिलांच्या मानसिक आणि भावनिक स्वास्थ्याचीही काळजी घेतली. त्यांच्या आपुलकीच्या स्वभावामुळे त्यांचे ग्राहक वाढत गेले. स्वतः निस्सीम स्वामीभक्त असल्यामुळे त्यांच्या ८० टक्के ग्राहक स्वामीभक्तच आहेत, ही त्या स्वामी समर्थ महाराजांची कृपाच असल्याचे त्या मानतात.

सामाजिक जाणीव जपणाऱ्या निशा प्लास्टिकबंदीच्या जनजागृतीतही सक्रिय आहेत. वर्तमानपत्रांपासून तयार केलेल्या पेहरावातून त्यांनी पर्यावरणपूरक संदेश देत स्पर्धेत पारितोषिकही मिळवले. महिलांना मोफत प्रशिक्षण देण्याचा त्यांचा उपक्रमही स्तुत्य आहे. मात्र हा प्रवास सोपा नव्हता. "तू मिडल क्लास आहेस. कमी शिकलेली आहेस. पुढे जाऊ शकत नाहीस," असे हिणवणारेही भेटले. अनेकदा अपमान सहन करावा लागला, अश्रू ढाळावे लागले. पण त्यांनी ठरवले खचायचे नाही, हार मानायची नाही. स्वतःचे अस्तित्व सिद्ध करायचे. आज चांगले विचार आणि आत्मविश्वास हेच खरे सौंदर्य. स्त्री ही केवळ गृहिणी नाही, तर ती कर्तृत्वाची मूर्ती आहे. घराला घरपण देत ती पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून जग जिंकत आहे.

भविष्यात समाजातील होतकरू महिलांसाठी व्यासपीठ उभारण्याचा त्यांचा मानस आहे. "स्वप्न बघा, आत्मविश्वास ठेवा आणि न डगमगता पुढे चालत राहा. यश नक्कीच मिळते," असा त्यांचा संदेश आहे. संघर्षाच्या मातीतून उमललेलं हे सौंदर्य आज अनेकांना नवा आत्मविश्वास देत आहे आणि म्हणूनच निशा फुलसुंदर या नावाचा प्रवास केवळ सौंदर्यस्पर्धेपुरता मर्यादित नसून, तो जिद्दीचा, श्रद्धेचा आणि स्वतःची ओळख निर्माण करण्याच्या अथक प्रयत्नांचा आहे.



निशा फुलसुंदर

कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडताना मंगळागौर, हळदीकुंकू अशा सांस्कृतिक कार्यक्रमांत सहभागी होत त्यांनी आपल्या कलेला वाव दिला. बालपणापासून असलेली कलेची आवड त्यांना फॅशन शोच्या व्यासपीठापर्यंत घेऊन गेली. २०२२ मध्ये Mrs. India Beautiful Face हा किताब आणि २०२३ मध्ये Icon Top 5 Classic आणि Beautiful Eyes असे सन्मान त्यांनी पटकावले. एका मध्यमवर्गीय गृहिणीसाठी हा केवळ पुरस्कार नव्हता, तर स्वतःच्या अस्तित्वाची पावती होती. या प्रवासात त्यांना मैत्रिणींची मोलाची साथ लाभली. त्यांच्या मैत्रिणींनी प्रोत्साहन, पाठबळ आणि आर्थिक मदत देत निशा यांना पुढे नेले. 'काही हात सोडून गेले, पण काहींनी योग्य मार्ग दाखवला,' असे त्या नम्रपणे सांगतात.

When Change Becomes Calling - Vaidehi Mohole





Success is often presented as a straight, predictable line of education, a stable job, and financial security. Any deviation from this path is frequently labelled as risk, restlessness, or even failure. For Vaidehi Mohole, unlearning this belief took years and ultimately reshaped her life.

Raised in Thane and educated at Saraswati Vidyalaya, Rabodi, Vaidehi grew up in an environment that valued creative expression as much as academics. Under the guidance of her teacher, Mira Korde, she discovered early that confidence is nurtured not only within classrooms but also on stage through dance, debate, elocution and performance. Creativity, even then, felt less like a pastime and more like instinct.

Yet, like many young students encouraged to choose stability, she followed what seemed to be the “safe” route. She pursued Science at V.G. Vaze Kelkar College, completed degrees in Life Sciences and Biotechnology, and later earned an MBA in Marketing from University of Mumbai. Her professional journey led her to a corporate role at HDFC Ltd.

From the outside, it appeared to be a well-charted success story. From within, however, it felt constricting. Four years into a structured 9 to 5 routine, Vaidehi realised that diligence alone cannot compensate for a lack of alignment. While some thrive within structure, she recognised her need for creative space.

Leaving a secure job was not a romantic leap; it was layered with doubt and uncertainty. Yet it marked the beginning of her most authentic chapter. She chose acting, dedicating months to training and auditions before securing a role in the television show Kiti Sangaychay Mala on Colors Marathi. Smaller roles followed in web series, films and daily soaps such as Baji, affirming that she was moving in the right direction.

Then came the pandemic, disrupting momentum across industries. Auditions shifted online, budgets tightened, and uncertainty loomed. Reinvention became less of a choice and more of a necessity. Drawing from her early musical training, Vaidehi transitioned into voice work dubbing, animation and advertising. The work was creatively fulfilling and financially stabilising, yet something essential felt absent. For a performer, presence matters.



Vaidehi Mohole

An unexpected opportunity soon expanded her purpose. Through a friend associated with an NGO, Vaidehi entered the world of educational content for public school students. This path eventually led her to 'Multiply India', where she contributed to improving financial literacy among rural women. What began as presenting training videos evolved into deeper engagement with content strategy, digital outreach and podcast hosting.

Through conversations with women who had built financial independence despite immense challenges, her understanding of empowerment deepened. These were not rehearsed narratives but lived realities stories of resilience unfolding quietly beyond headlines. Hosting these dialogues reaffirmed her belief that storytelling is not merely expression; it is intervention.

This final dimension of her work emerged from personal experience. Having endured a toxic marriage, she came to understand that healing is rarely linear but it is always possible. For her, transforming pain into purpose became an act of quiet resilience.

Vaidehi believes feminism and women’s empowerment are not trends but enduring responsibilities. While conversations around these themes are growing louder, she recognises how much remains unfinished. Her ambition is not to change the world overnight, but to contribute meaningfully skill by skill, story by story, woman by woman. After all, oceans are formed drop by drop.

For Vaidehi Mohole, reinvention is not a failure of planning. It is a natural response to growth. And when skills align with purpose, life often meets courage halfway.

Vaidehi’s work spans podcast hosting, presenting government-led AI training modules for Brihanmumbai Municipal Corporation teachers, and conducting trauma-healing sessions for women navigating emotionally abusive or toxic relationships.

The Synergy of Success : Insights from Dr Ushavati Shetty

Team Hastkala Life recently had the honour of engaging in an inspiring and insightful interaction with Dr Ushavati Shetty, the Founder and Director of C4Cynergy. A distinguished educationist and lifelong learner, Dr Ushavati Shetty brings over 25 years of transformative experience, rising from Head Teacher to Principal while continually redefining excellence in education. She holds a PhD, along with numerous degrees and specialisations in Botany, Aerobiology, Psychology, Administration, Leadership, Education, and Management, and is an author, reflecting her multidisciplinary depth and academic brilliance.

Recently invited as a State Guest to Sri Lanka by the Ministry of Education, Government of Sri Lanka, she has also proudly represented India at the SAARC Education Summit in Nepal, strengthening her global educational presence. An internationally recognised educator and recipient of numerous national and international awards, she continues to shape the future of learning. Through her pioneering work at C4Cynergy, anchored in Collaboration, Consultation, Coaching, and Counselling, Dr Ushavati Shetty passionately bridges the gap between education and employability, transforming the learning journey into a meaningful pathway toward real-world success.



Q. What was the "defining moment" that pushed you to build C4Cynergy?

- With 25 years in education, my perspective shifted profoundly while serving as a NABET Assessor (QCI). Assessing rural and tribal schools revealed a hard truth: while these children are our nation's "real wealth," a massive gap exists between teaching and actual learning outcomes, a divide only worsened by COVID.

I realised that quality education must not be defined by geography. Every child, whether in a tribal village or a metro city, deserves excellence. Because a system is only as strong as its educators, I felt a responsibility to look beyond my role as a principal. I founded C4Cynergy to bridge this gap by empowering teachers and ensuring that every child receives the quality education they rightfully deserve. When we strengthen the teacher, we secure the nation's future.

Q. Having seen education systems worldwide, what is the greatest strength of Indian schooling, and what is the one "missing piece" we must adopt?

- I believe the greatest strength of Indian schooling lies in its deep-rooted value system, which nurtures respect, discipline, and a strong moral compass. These cultural foundations are our biggest advantage, shaping responsible citizens rather than just capable students.

However, we must urgently integrate future-readiness, embracing globalisation, digital connectivity, and the power of AI. In today's global ecosystem, critical thinking, collaboration, and technological fluency are essential. The way forward is not to abandon our values, but to blend them with innovation-driven pedagogy and experiential learning. By combining our timeless ethos with global competencies, we will create an education system that is both rooted and revolutionary, preparing students to lead in an ever-evolving world.

Q. Parents invest heavily in early education, yet a "career-readiness gap" remains. Where is the disconnect, and how do we fix it?

- The disconnect lies in alignment, not investment. A major gap is the lack of early career awareness, leading students to choose paths based on societal expectations rather than aptitude. Furthermore, schooling remains isolated from industry realities and experiential learning.

To bridge this, we must shift from an exam-centric model to a competency-driven ecosystem. In an era of AI and globalisation, we must reward mastery over marks and problem-solving over rote performance. Career readiness should be intentionally cultivated from the early years through teacher empowerment and digital fluency. When education aligns with future demands, parental investment will translate into capable, confident, and future-ready individuals rather than just degrees.



Dr Ushavati Shetty

To every woman: reclaim your passions. Whether it is dance, art, or travel, these are lifelines, not distractions. We must normalise self-care as being as vital as caring for others. When you replenish yourself, you don't just continue, but you thrive.

Q. Beyond the 'International' labels, hefty fees, and marketing jargon, what in your view defines a truly global education behind the fancy brochures?

- Global education is defined not by branding or fees, but by mindset, methodology, and measurable impact. A genuinely global school develops students who think critically, communicate across cultures, and adapt to rapidly changing environments. It moves beyond rote learning toward inquiry, application, and collaboration.



Recent visit to Sri Lanka as a state invited guest by the Ministry of Education, Govt of Sri Lanka

True global education integrates strong academic foundations with experiential learning, digital fluency, and the responsible use of AI. It exposes students to diverse perspectives while grounding them in strong values and cultural identity. By building research skills and ethical leadership, it prepares learners to thrive in any professional or social ecosystem worldwide.

Ultimately, global education is measured by the competence, character, and confidence of its students. Beyond infrastructure, what defines it is whether the school nurtures adaptable, future-ready individuals who can contribute meaningfully in a connected and complex world.

Q. What is the one psychological "tool" you would gift every young girl graduating today?

If I could gift one psychological tool to every graduating girl, it would be an unshakeable sense of self-belief anchored in deep self-awareness. This steady inner voice protects against comparison and bias. By trusting her ability to evolve, she becomes resilient, choosing courage over comfort and viewing failure as feedback rather than finality.

This foundation prevents her from shrinking; it empowers her to create her own space, negotiate boldly, and pursue opportunities without permission. With this conviction, she will not merely chase success; she will define it on her own terms, redefining possibilities for generations to come.

Q. As someone who listens to and guides others constantly, how do you replenish your own energy? What does "self-care" look like for a veteran counsellor?

- As someone who constantly guides and holds space for others, I have learned that self-care is not indulgence, it is survival, strength and sustainability. As women, we are raised as natural givers, prioritising homes, workplaces, and relationships. Somewhere in that constant giving, we quietly begin to lose ourselves; that is why replenishing your own energy is essential.

Self-love should never carry guilt; neglecting yourself eventually exhausts your capacity to care for others. "Me time" is what makes responsibility sustainable and joyful. For me, this is intentional: Bharatanatyam reconnects me with my roots, while travel and nature ground my spirit. I also stay closely connected to my early mentors and teachers, which keeps me anchored, while my family and friends provide emotional renewal.






डिजिटल युगातील प्रेरणादायी आवाज; डॉ. मंजिरी पुराणिक यांची 'सर्व काही' क्रांती

डिजिटल माध्यमांच्या वाढत्या प्रभावाचा सकारात्मक आणि जबाबदार वापर करण्याच्या उद्देशाने त्यांनी सुरू केलेले 'सर्व काही' हे आज मराठीतील अग्रगण्य आणि लोकप्रिय पॉडकास्ट चॅनेल म्हणून ओळखले जाते. विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर मिळून ८.५ लाखांहून अधिक सबस्क्राइबर्स आणि कोट्यवधी व्ह्यूजच्या माध्यमातून या व्यासपीठाने व्यापक प्रभाव निर्माण केला आहे. यूट्यूब सिल्व्हर प्ले बटण हा या यशाचा मानाचा तुरा ठरला आहे. आरोग्य, आध्यात्म, आर्थिक साक्षरता, मानसिक स्वास्थ्य, नातेसंबंध, वैयक्तिक विकास आणि सामाजिक प्रश्न अशा विविध विषयांवर संशोधनाधिष्ठित आणि संतुलित चर्चा करणे हे या पॉडकास्टचे वैशिष्ट्य आहे. प्रत्येक भागासाठी विषयांची निवड प्रेक्षकांच्या प्रतिसादांचा अभ्यास, सामाजिक प्रवाह आणि तरुण पिढीसमोरील बदलती आव्हाने लक्षात घेऊन केली जाते.

डिजिटल युगातील प्रेरणादायी आवाज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डॉ. मंजिरी पुराणिक यांनी वैद्यकीय विज्ञान, समग्र आरोग्यदृष्टी, मानसिक सुदृढता आणि डिजिटल माध्यमांचा जबाबदार वापर यांचा प्रभावी संगम घडवून समाजमनावर ठसा उमटवला आहे. डॉक्टर, अमेझॉन बेस्टसेलर लेखिका, उद्योजिका, हेल्थ ॲण्ड वेलनेस कोच आणि प्रभावी पॉडकास्टर या विविध भूमिकांमधून त्यांनी बहुआयामी कार्य केले आहे. त्यांची ओळख केवळ एक यशस्वी वैद्यकीय तज्ज्ञ म्हणून मर्यादित न राहता, समाजाला दिशा देणाऱ्या विचारवंत नेत्या म्हणूनही दृढ झाली आहे.

आज माहितीच्या प्रचंड गर्दीत विश्वासार्ह, संशोधनाधिष्ठित आणि मूल्यकेंद्रित संवादाची नितांत गरज आहे. ही गरज ओळखून डॉ. पुराणिक यांनी विज्ञान, आध्यात्म आणि व्यावहारिक जीवनशैली यांना जोडणारा संतुलित दृष्टिकोन समाजासमोर मांडला. निरोगी शरीर, स्थिर मन आणि सजग समाज ही त्यांच्या कार्याची प्रमुख त्रिसूत्री आहे. वैद्यकीय शिक्षणासाठी त्यांनी मुंबईतील जीएस मेडिकल कॉलेज आणि केईएम हॉस्पिटल येथून एमबीबीएस व एमडी पदव्या संपादन केल्या. क्लिनिकल अनुभवाबरोबरच त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रमाणपत्रे मिळवत आपली व्यावसायिक क्षमता अधिक सक्षम केली. हार्वर्ड-प्रमाणित ओबेसिटी व कॉस्मेटिक फिजिशियन, मेयो क्लिनिक-प्रमाणित हेल्थ कोच तसेच यूकेमधील एमबीए या शैक्षणिक पात्रतांमुळे त्यांनी आरोग्याकडे बहुआयामी आणि डेटा-आधारित दृष्टीकोन विकसित केला.



२५ वर्षांहून अधिक अनुभवाच्या बळावर त्या ओबेसिटी मॅनेजमेंट, नॉन-इन्व्हेसिव्ह एस्थेटिक्स, मानसिक स्वास्थ्य आणि स्पिरिच्युअल वेलनेस या क्षेत्रांत कार्यरत आहेत. 'Insta Sculpt' या ब्रँडअंतर्गत भारत, दुबई आणि कुवेत येथे १५ अत्याधुनिक क्लिनिक्स स्थापन करून त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभाव निर्माण केला आहे. त्यांच्या उपचारपद्धतीत वजन कमी करणे ही केवळ बाह्य बदलांची प्रक्रिया नसून मेटाबॉलिक सुधारणा, हार्मोनल संतुलन, भावनिक सवयींमध्ये सकारात्मक बदल आणि दीर्घकालीन जीवनशैली परिवर्तन यांवर विशेष भर दिला जातो.

लेखन क्षेत्रातही त्यांनी ठसा उमटवला आहे. त्यांचे इंग्रजी पुस्तक The Soulful Scale हे अमेझॉन बेस्टसेलर ठरले. या पुस्तकात स्थूलत्वाकडे केवळ कॅलरी मोजण्याच्या दृष्टीने न पाहता, जैविक प्रक्रिया, मानसिक पॅटर्न, भावनिक खाण्याच्या सवयी आणि आत्मप्रतिमा यांचा सखोल ऊहापोह करण्यात आला आहे. तसेच त्यांचे मराठी पुस्तक 'स्थूलत्व ते पूर्णत्व' हेही वाचकांच्या पसंतीस उतरले. मराठी वाचकांसाठी वैज्ञानिक माहिती, व्यवहार्य मार्गदर्शन आणि प्रेरणादायी विचार सुलभ भाषेत मांडण्याचे कार्य या पुस्तकाने केले आहे. ही पुस्तके केवळ वजन कमी करण्यापुरती मर्यादित नसून आत्मस्वीकृती, शिस्त, सजगता आणि संतुलित जीवनशैलीचा मार्ग दाखवणारी आहेत.

भारताबरोबरच यूके, अमेरिका आणि मध्यपूर्वेतही 'सर्व काही'चे श्रोते आहेत. मराठी भाषेला जागतिक व्यासपीठ मिळवून देण्यात या उपक्रमाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. डिजिटल क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना United States Embassy कडून "Influencer of the Western Digital Lanscape of India" हा सन्मान प्रदान करण्यात आला. हा गौरव त्यांच्या जबाबदार आणि मूल्याधारित डिजिटल नेतृत्वाची दखल घेणारा आहे.

आज डॉ. मंजिरी पुराणिक या "डॉक्टर, लेखिका, पॉडकास्टर, हेल्थ अँड वेलनेस कोच" म्हणून व्यापकपणे परिचित आहेत. विज्ञान, आध्यात्म आणि समाज यांना जोडून समतोल, सजग आणि निरोगी समाज घडवणे हे त्यांचे स्पष्ट ध्येय आहे. त्यांची वाटचाल ही केवळ वैयक्तिक यशाची कथा नसून आधुनिक भारतीय स्त्रीच्या नेतृत्व गुणांची, ज्ञानाची आणि सामाजिक बांधिलकीची प्रेरणादायी गाथा आहे.






Shraddha Hardikar Shinde: A Graceful Torchbearer of Kathak and Bharatnatyam

In the vibrant world of Indian classical dance, Shraddha Hardikar Shinde stands as a dedicated artist, passionate educator, and visionary cultural ambassador. As the Founder and Principal of Nupur School of Kathak, Thane, she has been instrumental in nurturing young talent while preserving and promoting the rich traditions of Kathak and Bharatnatyam for over 20 years.

Shraddha was raised in a deeply educated, culturally rich family. Her father, Pramod Hardikar—a Sir J. J. School of Art alumnus and founder of Shravan Arts- was a pivotal founding member of Dombivli Gymkhana and an Honorary Secretary of Baramati Gymkhana. Her mother, a PhD holder and retired Zoology HOD at Kelkar College, was a respected professor with several patents related to cancer. Her brother currently serves as an IAS officer and Managing Director of Maha Metro. This academically driven upbringing instilled the discipline, focus, and cultural values Shraddha carries today.

Shraddha's journey in classical dance reflects deep-rooted dedication and disciplined training. She learned Kathak under the guidance of the renowned danseuse, the late Smt. Madhurita Sarang, and is currently refining her artistry under the mentorship of eminent Guru Pandit Shri Rajendra Gangani. Her academic excellence complements her artistic pursuit; she is currently pursuing a PhD in Liberal Arts (Kathak). She holds a Master's degree in Liberal Arts (Kathak) from Dr D. Y. Patil School of Liberal Arts, Pune, and has been selected for a prestigious scholarship in Kathak Dance by the Ministry of Culture, Government of India. In addition, she has completed 'Visharad' and 'Arangetram' in Bharatanatyam under the guidance of Late Vaishali Shanbag.

Over the years, Shraddha has carved a remarkable presence on prestigious stages across India. She has performed at the 83rd Aundh Sangeet Mahotsav, Pandit Ram Marathe Mahotsav (Thane), Swarsagar Cultural Festival (Pimpri Chinchwad), and Kolhapur Dashara Mahotsav and Dombivli Konkan Mahotsav. Her artistry has also been showcased at the Achchan Maharaj Festival in New Delhi, Odissi Festival Mumbai, and the Nehru Centre's Yuva





Mahotsav. One of her notable conceptual works includes "Yun Sajaa Chand," a unique Kathak production themed on the Moon, performed at the Amphitheatre of Bhandarkar Institute, Pune (November 2022).

Her choreographic brilliance extends to Kathak presentations on Hindi movie songs. Shraddha's artistic collaborations reflect her versatility and dynamic stage presence. She performed at Shiamak Davar's 'Yes' Programme and was part of "Believe," sharing the stage with celebrated artists like Louis Banks, Taufiq Qureshi, Rajiv Goswami, and Roop Kumar Rathod. She has been featured in the Kathak fusion video "Gosha Nashi," released by V-Channel and directed by Rajiv Goswami,


Through her institution, performances, and academic pursuits, Shraddha Shinde continues to inspire aspiring dancers and audiences alike. With unwavering commitment to tradition and innovation, she embodies grace, scholarship, and artistic excellence, truly a shining name in the realm of Indian classical dance.

and has also performed with renowned singer Hariharan in his private concert. Additionally, she has performed for DNA Entertainment and shared the stage with Pandit Rajan Sajan Mishra at a prestigious event hosted by Nrityadarshan in Pune.

Her contributions to the field have been recognised with the esteemed "Nritya Gaurav Adarsha Dombivilikar Puraskar."

Shraddha strongly believes that Indian classical arts require time, patience, and complete surrender. In today's fast-paced, AI-driven world, instant gratification has become common, but classical art is a lifelong sadhana. It unfolds gradually through consistent riyaaz, deeper understanding, and inner growth. According to her, true creativity emerges only when one dedicates time and unwavering commitment to the art form.











गाण्यातून निलम भोगटे यांच्या आयुष्याला मिळाली ऊर्जा

संगीत शिक्षिका असणाऱ्या आईच्या स्वरांतून उमटणाऱ्या गाण्यांनी जणू नीलम भोगटे यांच्या बालमनावर नकळत संगीताची मोहोर उमटवली. शिक्षण बारावीपर्यंत असले तरी संगीताचे धडे त्यांनी आयुष्याकडूनच घेतले. शाळेच्या प्रार्थनेपासून माईकवरच्या पहिल्या गाण्यापर्यंतचा प्रत्येक क्षण त्यांचा आत्मविश्वास वाढवत गेला. अशा हळुवार सुरुवातीमधून गायन केवळ छंद न राहता, नीलम भोगटे यांच्या जीवनाचा अविभाज्य, श्वासासारखा भाग बनत गेला.

निलम भोगटे (माहेरचे नाव - निलम महादेव काणेकर) यांची आई सतत काम करत असतानाही गाणी गुणगुणत असायची. त्या सुरेल वातावरणाचा खोल परिणाम नीलम यांच्या मनावर झाला आणि तिथूनच गायनाची आवड हळूहळू बहरत गेली. जिथे गाण्याची संधी मिळते, तिथे त्या आवर्जून जातात. "संधीचे सोने करावे" हे त्यांनी सहजतेने आत्मसात केले आहे. गायनाचे धडे त्यांनी प्रथम माधवी कोलगे आणि त्यानंतर सुवर्णा दत्ता यांच्याकडे घेतले सध्या त्या विविध ज्येष्ठ नागरिक संघांमध्ये गाणी सादर करतात. त्यांच्या गायनातून प्रेक्षकांना आनंद, समाधान आणि सकारात्मक ऊर्जा मिळते.



नीलम भोगटे

"जोपर्यंत गळा साथ देईल, तोपर्यंत मी गाणे गायचे सोडणार नाही," असे त्या सांगतात. त्यांच्या मते, गाणे ही केवळ कला नसून एक प्रभावी संगीत थेरपी आहे, जी मनाला शांती आणि जीवनाला नवी उमेद देते.

संगीताच्या माध्यमातून स्वतःचा आनंद जपत इतरांच्या आयुष्यातही आनंदाचे सूर पेरणाऱ्या नीलम भोगटे यांचा प्रवास आयुष्याला ऊर्जा देणारा ठरला.

कॅमेऱ्यामागच्या कथाकार

(पान १ वरून)

ठाण्यातील पत्रकारितेचा काळ त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टर्निंग पॉइंट ठरला. सामाजिक विषयांवर काम करताना त्यांना जाणवलं की काही वेळा सत्य समोर असूनही लोकांना ते दिसत नाही. लेखणीतून प्रश्न मांडता येतात, पण पडद्यावरील दृश्य थेट काळजाला भिडतात. त्याच क्षणी त्यांनी ठरवलं गोष्टी फक्त लिहायच्या नाहीत, तर त्या लोकांसमोर जिवंत करायच्या. २००८ साली त्यांनी चित्रपट क्षेत्राकडे वळण्याचा निर्णय घेतला. पत्रकारितेमुळे निरीक्षणशक्ती प्रखर होती. तांत्रिक कौशल्य वाढवण्यासाठी त्यांनी पुण्यात शिक्षण घेतले आणि पुढे मुंबईत डिजिटल अकॅडमीत एडिटिंगचा कोर्स पूर्ण केला. एडिटिंग म्हणजे केवळ शॉट्स जोडणे नाही, तर भावनांना योग्य ठिकाणी नेमकं स्थान देणं ही जाणीव त्यांना झाली. या प्रवासात त्यांना अनेक दिग्गजांसोबत काम करण्याची संधी मिळाली. संजय सूरकर, स्मिता तळवलकर, रजत कपूर, अक्षय कुमार यांसारख्या मान्यवरांसोबत काम करताना प्रत्येकाची कथा सांगण्याची शैली वेगळी असल्याचे त्यांनी अनुभवले. हा प्रवास संघर्षमय होता, पण निरीक्षणशक्ती हीच त्यांची खरी ताकद ठरली.

त्यांच्या अलीकडील 'पिरमाचा नाद खुळा' या गाण्याने सोशल मीडियावर अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. या गाण्याची संकल्पना सुचताना त्यांना काहीतरी वेगळं करायचं होतं. मातीतलं, अस्सल गावाकडचं प्रेम पडद्यावर आणायचं या हेतूने त्यांनी आपल्या मामाच्या गावी, आघई येथे शूटिंग करण्याचा निर्णय घेतला. आदिवासी भागातील लोककला, निसर्ग आणि निरागस प्रेम यांचं सुंदर चित्रण त्यांनी या गाण्यातून चित्रित केलं. एक स्त्री म्हणून म्युझिक डायरेक्शन आणि स्टोरीटेलिंगमध्ये स्वतःची छाप पाडण्याचा त्यांचा प्रयत्न या गाण्यात स्पष्ट दिसतो. या प्रोजेक्टमध्ये त्यांनी संकल्पना, पटकथा आणि निर्मिती अशी तिहेरी जबाबदारी सांभाळली. वेळ, बजेट आणि गुणवत्ता या तिन्हींचा समतोल राखणं हे सर्वात मोठं आव्हान होतं. लेखिका म्हणून कथा फुलवायची आणि निर्माती म्हणून व्यवहार सांभाळायचे या दोन्ही भूमिका त्यांनी समर्थपणे निभावल्या. संपूर्ण टीमचं व्यवस्थापन, परवानग्या, शूटिंगची आखणी या सगळ्या जबाबदाऱ्या पार पाडताना त्यांची शिस्त आणि संयम प्रकर्षाने दिसून आला. स्त्री दिग्दर्शक म्हणून इंडस्ट्रीत काम करताना काही पूर्वग्रहांचा सामना करावा लागला, हे त्या स्पष्टपणे मान्य करतात. मात्र त्यांचं मत ठाम आहे, काम बोलतं तेव्हा लिंगभेद गळून पडतो. सेटवरची स्पष्टता, आत्मविश्वास आणि संवेदनशीलता ही त्यांची वैशिष्ट्य ठरली आहेत. त्यांना वाटतं की, स्त्री दिग्दर्शकाकडे एक वेगळी भावनिक समज असते आणि तीच तिची मोठी ताकद असते.

गाणं व्हायरल झाल्यानंतरचा क्षण त्यांच्या आयुष्यातील



अविस्मरणीय ठरला. रील्स, शेअर्स, कमेंट्स आणि चाहत्यांचे डान्स व्हिडिओ पाहताना त्यांना जाणवलं हे गाणं आता केवळ त्यांचं राहिलेलं नाही, ते लोकांचं झालं आहे. या यशामुळे नवीन कलाकार आणि निर्मात्यांशी संवाद सुरू झाला असून मोठ्या प्रोजेक्ट्सची दारे खुली झाली आहेत. मात्र कथा आणि गुणवत्तेवर कोणतीही तडजोड करायची नाही, हा त्यांचा निर्धार कायम आहे.

प्रेरणास्थानांविषयी बोलताना त्या संगीतकार अजय-अतुल, ए.आर.रेहमान आणि स्नेहा खानवलकर यांचा उल्लेख करतात. दिग्दर्शनात व्ही. शांताराम यांचं व्हिजन आणि टेक्निकल परफेक्शन त्यांना भावतं, तर राजकुमार हिरानी, संजय लीला भन्साळी, सुमित्रा भावे आणि सई परांजपे यांची काम करण्याची शैली त्यांना प्रेरणा देते.

पत्रकारितेने त्यांना सत्याची जाणीव, संयम आणि माणसांना समजून घेण्याची दृष्टी दिली. विषयाचा सखोल अभ्यास करून तो सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याची कला त्यांनी तिथेच आत्मसात केली. पुढील काळात वास्तववादी कथा, लोककला आणि आधुनिकतेचा संगम, स्त्री-केंद्रित विषय आणि अस्सल प्रेमकथा यावर काम करण्याची त्यांची इच्छा आहे. ठाण्यातील तरुण मुलींना त्या एकच संदेश देतात. टॅलेंट महत्त्वाचं आहेच, पण शिस्त, सातत्य आणि आत्मविश्वास तितकाच आवश्यक आहे. 'नाही,' ऐकायला तयार रहा, टीका सहन करा, पण तुमचा आवाज आणि तुमची ओळख कधीही कमी समजू नका. स्पष्ट व्हिजन आणि मेहनतीची तयारी असेल, तर यश तुमच्यापर्यंत नक्की पोहोचतं यावर त्यांचा ठाम विश्वास आहे.

Pegboard: Bringing Order to the Brand World

(From Pg. 1)

To achieve this, the team ensures that Data Meets Soul. In an era where branding often begins with moodboards, Pegboard starts with questions. Esha and Tejasvi employ a "gut + data" method for blending instinct with rigorous research. Through consumer interviews, cultural listening, and pattern mapping, they uncover a brand's emotional centre long before any visual identity is created. The philosophy is simple: a brand's "soul" isn't a tagline or a colour palette; it is the reason people return and trust. By identifying the tension a brand resolves, design becomes an expression of the core, rather than just a decorative layer.





This methodology results in Living Brand Ecosystems that are organised but never static. Instead of rigid rules, the agency creates modular brand systems and frameworks that allow founders and teams to evolve their content and campaigns without reinventing the wheel. In today's culture-led economy, where trends shift rapidly, Pegboard helps brands anchor themselves in consistent values and flexible systems. A brand is viewed as a living ecosystem that maintains coherence while responding to change, a modular approach that even extends to how Pegboard hires its talent.

This is made possible through an Interconnected Approach. Traditional branding often works in silos: strategy first, design next, marketing later, but Pegboard intentionally blurs these boundaries. Strategy informs content, content shapes community, and community feeds back into product positioning. This model allows the firm to act as both consultant and collaborator, sometimes stepping in as fractional brand partners or co-creating intellectual property with founders. In doing so, they challenge the idea that branding is a one-time exercise, transforming it into an ongoing relationship between a business and its audience.

As they look towards the future, the founders offer a Golden Peg of Wisdom for women building their own brands today: "Clarity is power. Be clear about what you stand for before the world tells you who to be. Build systems early, even if they are simple. And don't be afraid to take up intellectual space - not just visual space - in your industry."

Over its first two years, the firm has positioned itself as a thinking partner, helping the next generation of brands navigate a noisy landscape with structure, soul, and adaptability.

Scan the QR code for Pegboard's IG page

Website: www.yourpegboard.com | Instagram: www.instagram.com/yourpegboard

Want to attend a Pegboard Picnic? Find the community page here on Instagram: www.instagram.com/pegboardpicnics

Pooja Surve: A Life Dedicated to Excellence in Rhythmic Gymnastics

Pooja Surve's journey in rhythmic gymnastics is a story of discipline, resilience, and lifelong commitment to the sport, as a player, coach, and international judge. Her association with gymnastics began early and evolved naturally into a career marked by national pride and international recognition.

As an international gymnast, Pooja represented India on some of the biggest global platforms. She competed at the Commonwealth Games 2010 in Delhi, where she became the only Indian rhythmic gymnast till date to qualify for the All-Around Individual Championship, securing a 16th CWG rank and finishing first from India. She also represented the country at the World Championships 2010 in Moscow and the Rhythmic Gymnastics World Cup 2010 in Belarus, where she made history by becoming the first Indian gymnast to receive the "Miss Exotic Performance Award" for the ribbon event. At the World Championships 2009 in Mie, Japan, she stood first among the Indian rhythmic gymnastics squad, further cementing her international standing.

She has been awarded the prestigious "Shree Shiv Chhatrapati Award " by the government of Maharashtra for achieving excellence in the field of Rhythmic Gymnastics.

Following her competitive career, Pooja transitioned into coaching and judging, continuing to contribute to the sport at the highest levels. As a coach, she completed the Asian Gymnastics Union Rhythmic Gymnastics Coaching Course in Malaysia and later earned a FIG Academy Level 1 RG International Coaching certification from the Federation Internationale de Gymnastique in the Philippines, where she achieved an international rank of third in the examination.





Pooja Surve



Beyond gymnastics, Pooja Surve has consistently excelled in the performing arts and academics. She is a trained Kathak dancer, having passed the Visharad Pratham examination from Akhil Bhartiya Gandharva Vidyalaya, and is also an expert ballet dancer. Her artistic excellence earned her the gold medal of the western zone of India during the competition for the Bala Shree Award for creative performance. She has won several accolades, including College Idol, the dance reality show Taalawar Taal de Dhamal on Mi Marathi, and the Shravan Queen beauty pageant for best ramp walk.

Her role as a judge has been equally distinguished. She has been a judge for 3 Olympic Cycles from 2017 till date, qualifying as a Category 3 international judge for both individual and group events. From 2017 to the present, she judged several international and national championships and also served as the Competition Director for the majority of events, such as the state nationals championships. Additionally, she has been appointed as an expert for the Sports Authority of India's Online Athlete Education Programme as a Programme Director.

Her all-round excellence was recognised academically as well when she was awarded Best Student of D.G. Ruparel College and won the Golden Trophy for three consecutive years for outstanding performance in academics, sports, and extra-curricular activities.

Pooja Surve's journey reflects not just personal success but a deep commitment to nurturing and advancing rhythmic gymnastics in India. She is now the Director of " The Phoenix Gymnastics Academy " in Thane.

Her contributions, as an athlete, mentor, and judge, continue to inspire the next generation of gymnasts.

वर्ल्ड रेकॉर्ड, ३६५ मुलाखतींची 'रचना'

लेखक, मुलाखतकार, संपादक, दिग्दर्शक आणि उद्योजिका अशा विविध भूमिका सक्षमपणे साकारणाऱ्या रचना लचके- बागवे यांचा प्रवास थक्क करणारा आहे. त्यांनी गेल्या १० वर्षांपासून 'अर्थसंकेत'च्या माध्यमातून मराठी उद्योजकांसाठी मोठे कार्य केले आहे. तर, गेल्या ४ वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या 'रचना आर्ट्स अँड क्रिएशन्स' (RACMedia) द्वारे त्यांनी आपली एक स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

रचना बागवे यांनी सुरुवातीला यूपीएससीचा (UPSC) अभ्यास केला. मात्र लग्नानंतर पतीसोबत 'अर्थसंकेत' या महाराष्ट्रातील पहिल्या आर्थिक आणि व्यवसायविषयक वृत्तपत्राच्या कामात त्यांनी स्वतःला झोकून दिले. १० हजार मराठी उद्योजकांना प्रथमच बॉम्बे स्टॉक एक्सचेंज (BSE) पर्यंत नेण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. ग्रामीण भागातील कामाच्या अनुभवातून त्यांनी रुरल डेव्हलपमेंटमध्ये मास्टर्स पूर्ण केले आणि आता त्या पीएचडी करत आहेत.

रचना यांच्या कारकीर्दीतील सर्वात मोठा टप्पा म्हणजे '365Days@365Stories' हा उपक्रम आहे. सलग ३६५ दिवस, दररोज एका उद्योजकाची मुलाखत घेऊन त्यांच्या यशोगाथा जगासमोर मांडण्याचे कठीण आव्हान त्यांनी पेलले. या विक्रमाची नोंद 'इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये झाली आहे.

केवळ उद्योजकताच नव्हे, तर आरोग्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांनी 'आरोग्यम धनसंपदा' हा स्तुत्य उपक्रम सुरू केला. यात केवळ डॉक्टरांचाच नव्हे, तर आरोग्य क्षेत्राचा कणा असलेल्या नर्सेस, वॉर्ड बॉईज आणि रुग्णवाहिका चालकांचाही गौरव केला जातो.

गेल्या २ वर्षांपासून त्या 'वुमन ऑफ इम्पॅक्ट' कम्युनिटीच्या माध्यमातून महिलांना खऱ्या अर्थाने सक्षम करत आहेत. केवळ कायदेशीर हक्क किंवा आर्थिक स्वातंत्र्यच नाही, तर स्वतःची ओळख कशी निर्माण करावी आणि स्वतःच्या पायावर आत्मविश्वासाने कसे उभे राहावे, यासाठी त्या विशेष प्रयत्नशील आहेत. महिलांनी स्वतःचे घर घेण्यापासून ते स्वतःचे अस्तित्व जपण्यापर्यंतचा प्रवास त्यांनी या माध्यमातून सुकर केला आहे.



रचना बागवे

'सप्तरंग उद्योजकतेचे' आणि 'आर्थिक गुंतवणुकीचे प्राथमिक धडे' यांसारख्या पुस्तकांतून त्यांनी आपली लेखणी जनसामान्यांपर्यंत पोहोचवली आहे. "स्वप्न बघत राहा आणि स्वतःवर विश्वास ठेवून काम करा," हा त्यांचा साधा पण प्रभावी मंत्र आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. एक बहुआयामी व्यक्तिमत्व म्हणून रचना बागवे यांचा हा प्रवास महाराष्ट्राच्या व्यावसायिक आणि सामाजिक क्षेत्रात नक्कीच दिशादर्शक ठरेल.

Walk FOR THE Weaves

